# वजन घटविण्याचे धातूशास्त्रज्ञांसमोर आव्हान

## मुख्यमंत्र्यांचे निरीक्षण : बीट्स पिलानीमध्ये तांत्रिक बैठकीचे उद्‌घाटन

पणजी, ता. ११ (प्रतिनिधी) : विमानांचे वजन जेवढे कमी, तेवढी त्यांच्या उड्डाणाची कक्षा रुंद असे समीकरण आहे. त्यामुळे त्यांचे वजन घटविणे हे धातूशास्त्रज्ञांसमोरील आव्हान आहे. ते त्यांनी पेलणे सुरूही केले आहे, असे निरीक्षण मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी आज झुआरीनगर येथे नोंदवले.

ते ५५ व्या धातूतज्ज्ञ दिनानिमित्त बीट्स पिलानीमध्ये आयोजित ७१ व्या तांत्रिक बैठकीचे उद्‌घाटन करताना बोलत होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेटल्सच्या मुंबई, पुणे व गोवा शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

धातुशास्त्र विषयातील पारंगत आणि अभियंत्यांना एकत्र आणण्यासाठी या वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदा संरक्षण, अवकाश आणि वाहतुकीसाठी वजन घटवणे या संकल्पनेवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

त्याचे उद्‌घाटन केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले, वजन कमी करण्यासाठी धातूविषयक संशोधन महत्त्वाचे ठरते. संरक्षण क्षेत्रात वजन कमी केल्यावर मारागिरी वाढते. त्यामुळे सातत्याने संरक्षण मंत्रालयाकडून वजन कमी करण्याविषयी आग्रह होत असतो.

शस्त्र असो, वाहन असो वा विमान साऱ्यांचे वजन तेवढे कमी होईल तेवढी त्यांची मारागिरी करण्याची क्षमता वाढत असे




झुआरीनगर : बीट्स पिलानीमध्ये शनिवारी धातूतज्ज्ञदिन सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर व इतर.

असा सरळ हिशेब त्यामागे आहे. वजन कमी करण्यात कार्बन आणि नॅनो टेक्नॉलॉजी अलीकडच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यांचा वापर वाढला पाहिजे. वजन कमी होण्याचा सरळ संबंध हा ऊर्जाची बचत करण्यातही आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.

बीट्स पिलानीचे कुलगुरू प्रा. शौविक भट्टाचार्य, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेटल्सचे अध्यक्ष डॉ. विश्वजित बसू यांचेही यावेळी भाषण झाले. संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे संचालक डॉ. एस. ख्रिस्तोफर, टाटा स्टीलचे माजी व्यवस्थापकीय संचालक एच. एम. नेरुरकर, महिंद्राचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी अरविंद भारद्वाज यांनी यावेळी सादरीकरण केले. हिंदाल्कोचे उपाध्यक्ष डी. भट्टाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली यावेळी परिसंवादही झाला. उद्या (ता.१२) केंद्रीय खाण सचिव अरुण कुमार यांच्या हस्ते लोह खनिजावरील परिसंवादाचे उद्‌घाटन होणार आहे. *सोमवारी (ता.१३) केंद्रीय खाणमंत्री चौधरी वीरेंद्रसिंग यांच्या हस्ते या क्षेत्रात गुणवत्तावान कामगिरी केलेल्यांना गौरविण्यात येणार आहे.*

त्यावेळी केंद्रीय पोलाद सचिव अरुणा शर्मा याही उपस्थित राहतील.

Scanned by CamScanner